# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

**सरदार वल्लभभाई पटेल प्रशासकीय इमारत, महात्मा गांधी रोड, नेहरू चौक जळगाव ४२५००१**

---

**जा.क्रं.ज.म.न.पा./प्रकल्प/१४७/२०२५**

**महानगरपालिका आयुक्त कार्यालय,**

**दिनांक ३१.१०.२०२५**

**आदेश** :

ज्या अर्थी, मे.मुंबई उच्च न्यायालयाच्या सुमोटो जनहीत याचिका क्रं.७१/२०२३ मधील आदेशा नुसार खड्डे आणि उघड्या मॅनहोल्समुळे होणारे मृत्यू आणि दुखापतींना आळा घालण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक महानगरपालिका क्षेत्र आणि जिल्ह्यात **भरपाई समित्या** (**Compensation Committees**) स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.

ज्या अर्थी, मे.मुंबई उच्च न्यायालयाच्या सुमोटो जनहीत याचिका क्रं.७१/२०२३ मधे संबंधित रस्ते-मालकी प्राधिकरणाचे सर्वात वरिष्ठ कार्यकारी प्रमुख व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे (DLSA) सचिव यांचा समावेश असलेली व्दिसदस्यीय समिती स्थापन करणेच्या सुचना आहेत.

त्या अर्थी, मे.मुंबई उच्च न्यायालयाच्या सुमोटो जनहीत याचिका क्रं.७१/२०२३ मधील निर्देशांनुसार जळगाव महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांवर खड्ड्यांमुळे होणारे मृत्यू आणि दुखापतींवरील भरपाईची रक्कम निश्चित करून वितरीत करणेसाठी खालील समितीची स्थापना करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| संबंधित रस्ते-मालकी प्राधिकरणाचे सर्वात वरिष्ठ कार्यकारी प्रमुख | जळगाव महानगरपालिका क्षेत्रासाठी आयुक्त जळगाव शहर महानगरपालिका |
| जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे (DLSA) सचिव | सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जळगाव |

(*स्वाक्षरीत*)

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**

**प्रत**:

१) **अतिरीक्त आयुक्त**, जळगाव शहर महानगरपालिका जळगाव.
२) **अधिक्षक**, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जळगाव.
३) **शहर अभियंता**, जळगाव शहर महानगरपालिका जळगाव.